PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ek Gaadi Baki Anadi
Year: 1989

Song: Prathmesha Parmesha
Lyricist: Shantran Nandgaonkar

प्रथमेशा परमेशा देवा
असशी कुठल्या गावा रे
अरे घसा फोडूनी करतो देवा
तुझा किती मी धावा रे

हो प्रथमेशा परमेशा देवा
असशी कुठल्या गावा रे
घसा फोडूनी करतो देवा
तुझा किती मी धावा रे
आम्ही करतो सेवा देती
शेजाऱ्यांना मेवा रे
कुठेतरी त्या चूक जाहली
घे त्याचा मागोवा रे
कुठेतरी त्या चूक जाहली
घे त्याचा मागोवा रे
आ... आ... आ...
हे शंकरा करतो तुझी प्रार्थना
हे शंकरा करतो तुझी प्रार्थना

रे आमच्यासाठी आम्ही
ना कधी काही मागितले
कर नाशच शेजाऱ्यांचा
इतुकेच तुला सांगितले
तरी तू असा बंगला दिला
गाडी दिलीस रे त्यांना
श्रीमंत तू केले तया
ना जागलास रे वचना
नेत्र उघड रे
नेत्र उघड रे

उघड उघड रे तिसरा डोळा
भस्म तया करण्या
भस्म तया करण्या
हे शंकरा करतो तुझी प्रार्थना
हे शंकरा करतो तुझी प्रार्थना

दह्या तुपाचे दिवे लाविले
ऊद धूप दाविले तुला
काय आमुचे चुकले देवा
राजा केले त्या रंकाला
राजा केले त्या रंकाला
नेत्र उघड रे
नेत्र उघड रे
उघड उघड रे तिसरा डोळा
भस्म तया करण्या
भस्म तया करण्या
हे शंकरा करतो तुझी प्रार्थना
हे शंकरा करतो तुझी प्रार्थना

घालिन लोटांगण वंदीन चरण
वाटोळं त्यांचं कर देवा
करून तांडव तुडवा त्यांचा
यशाचा मांडव महादेवा
पुजाही करतो तुझीच देवा
विकून सारी भांडी कुंडी
त्या सटवीच्या झिंज्या धरूनी
मुरगळ पोराची मुंडी
तोंडाला त्यांच्या फासून काळं
भिकारी कर माजोऱ्यांना

संसार त्यांचा मातीत मिळू दे
हरे राम म्हणू दे शेजाऱ्यांना
हरे राम हरे राम जयराम
हरे राम हरे राम म्हणू दे शेजाऱ्यांना

हरे राम हरे राम जयराम
हरे राम हरे राम म्हणू दे शेजाऱ्यांना
हरे राम हरे राम जयराम
हरे राम हरे राम म्हणू दे शेजाऱ्यांना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*